# राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयात कृषिदिन साजरा!!



प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालया त कृषिदिनाच्या निमित्ताने वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.कृषिदिन व शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवड मोहिमेअंतर्गत महाविद्यालयाच्या आवारात विविध रोपांच्या लागवडीला सुरुवात करण्यात आली.संस्थाध्यक्ष मा. श्री.रविंद्रजी माने,कार्याध्यक्षा सौ.नेहा माने,प्रद्युम्न माने, प्राचार्य डॉ.महेश भागवत,तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा.नितीन भोपळे यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या नेचर क्लबचे प्रमुख समन्वयक प्रा. मंगेश प्रभावळकर यांनी कृषिदिन व वृक्षलागवडीचे महत्त्व विषद केले.तसेच विविध जातीच्या जवळपास १५० रोपांची लागवड करण्यात येणार असल्याचे सांगितले.यामध्ये कडुलिंब,बदाम,रबर,काजू,आंबा,रक्तचंदन,गुलमोहर इ.विविध प्रकारच्या रोपांचा समावेश असणार आहे.याप्रसंगी संस्थाध्यक्ष मा. श्री.रविंद्रजी माने,कार्याध्यक्षा सौ.नेहा माने,प्रद्युम्न माने, प्राचार्य डॉ.महेश भागवत,तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा.नितीन भोपळे व सर्व विभागप्रमुख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.विविध विभागांचे प्राध्यापक व कर्मचारीही याप्रसंगी उपस्थित होते.